# बोडवड महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना हिवाळी शिबिर प्रारंभ
# दिव्याग विद्यार्थ्याने केले उदघाटन

(26.12.2019) देशाची एकात्मता व अखंडता टिकून ठेवण्यासाठी तरुणांचे योगदान महत्वाचे आहे. युवाशक्तीचा योग्य वापर करून भारताची प्रगति होऊ शकते, असे मत आहे शिबिराचे उदघाटनप्रसंगी समारंभाचे अध्यक्ष व संस्थेचे सचिव मा.श्री. विकासभाऊ कोटेचा यांनी व्यक्त केले तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य प्राध्यापक अरविंद चौधरी यांनी स्वयंसेवकांना मार्गदर्शन करून मनोबल वाढीविले.

दिनाक २६ डिसेंबर २०१९ रोजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय बोदवड येथील रा .से . यो एककाच्याच्या विशेष हिवाळी शिबिराला दत्तक ग्राम हरणखेड येथे सुरुवात झाली .शिबिराचे उद्घाटन प्रसंगी संस्थेचे सचिव मा . श्री विकास भाऊ कोटेचा उपस्थित होते. शिबिराचे उद्घाटन जि.प. शाळेतील दिव्यांग विद्यार्थी ओम खाचणे यांच्या हस्ते संपन्न झाला. प्रमुख अतिथि म्हणून हरणखेड येथील माजी सरपंच श्री. गोविंद फिरके, संस्थेचे जेष्ठ संचालक श्री .श्रीरामभाऊ बडगुजर, श्री. रविंद्रभाऊ माटे उपस्थित होते .शिबिराचे प्रास्ताविक सहाय्यक कार्यक्रम आधिकारी प्रा. नितेश सावदेकर यांनी केले व शिबिरात होणाऱ्या कार्यक्रमाची माहिती दिली . सूत्र संचालन कु. गायत्री मराठे व आभार पुरुषोत्तम पाटील या स्वयंसेवकांनी केले. शिबिराचे नियोजनासाठी संस्थेचे अध्यक्ष श्री. मिठूलालजी अग्रवाल यांचे मार्गदर्शन लाभले. प्रसंगी कार्यक्रम अधिकारी डॉ. चेतनकुमार शर्मा महिला कार्यक्रम अधिकारी श्रीमती कंचन दमाडे व सर्व स्वयंसेवकाचे व गावातील नागरिक रूपेशभाऊ गांधी , नरहरी वराडे(उपसरपंच), विवेक जोशी , श्रीकृष्णा रोकडे, आस्तिक अहिर, यांचे सहकार्य लाभले










